जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत
27 DEC 2025

# संघर्ष, समाजभान, निर्भिड पत्रकारितेची समाजाला गरज

**■ डॉ. शिवाजी जाधव : शिवाजी विद्यापीठात मीडिया लेखन कार्यशाळेचा समारोप**

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशातील प्रारंभीच्या वर्तमानपत्रांनी आर्थिक अडचणी, सामाजिक दबावांचा सामना करत पत्रकारितेचा पाया भक्कम केला. अशा संघर्ष, सामाजिक जाणीव आणि निर्भीड विचारांवर आधारित भारतीय पत्रकारितेची आज गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

विद्यापीठाच्या हिंदी विभागात आयोजित सात दिवसीय मीडिया लेखन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी उपस्थित होत्या.

डॉ. जाधव म्हणाले, महाराष्ट्रातील मराठी पत्रकारितेनेही कठीण परिस्थितीत ओळख निर्माण केली. या अनुभवांतूनच जबाबदार आणि निःष्पक्ष पत्रकार घडतो. सोशल मीडियावर वेगाने पसरवली जाणारी माहिती अनेकदा अपुरी किंवा दिशाभूल करणारी असू शकते. त्यामुळे कोणतीही बातमी स्वीकारण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे आवश्यक आहे.

डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये मीडिया लेखनाबाबत नवी दृष्टी आणि आत्मविश्वास निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला. विद्यार्थी प्रतिनिधी संदीप बरगे आणि स्वप्नाली धुलुगडे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यशाळेचे डॉ. जयसिंग कांबळे यांनी आयोजन केले. अविनाश कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. श्रीकांत देसाई यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
27 DEC 2025
वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# सोशल मीडियावरील माहितीबाबत सावध राहा

## – डॉ. शिवाजी जाधव



**कोल्हापूर :** सोशल मीडियावर वेगाने पसरवली जाणारी माहिती अनेकदा अपुरी किंवा दिशाभूल करणारी असू शकते. त्यामुळे कोणतीही बातमी स्वीकारण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे आवश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजीराव जाधव यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागात आयोजित सातदिवसीय मीडिया लेखन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी उपस्थित होत्या.

भारतीय पत्रकारितेची वाटचाल ही संघर्ष, सामाजिक जाणीव आणि निर्भीड विचारांवर आधारित राहिली आहे. देशातील प्रारंभीच्या वर्तमानपत्रांनी आर्थिक अडचणी, सामाजिक दबावांचा सामना करत पत्रकारितेचा पाया भक्कम केला. महाराष्ट्रातील मराठी पत्रकारितेनेही अशाच कठीण परिस्थितीत आपली ओळख निर्माण केली. या अनुभवांतूनच जबाबदार आणि निःपक्ष पत्रकार घडतो, असेही डॉ. जाधव म्हणाले.

यावेळी विद्यार्थी प्रतिनिधी संदीप बरगे, स्वप्नाली धुलुगडे यांनी अनुभव मांडले. कार्यशाळेचे आयोजन डॉ. जयसिंग कांबळे, सूत्रसंचालन अविनाश कांबळे यांनी केले. आभार श्रीकांत देसाई यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 7 DEC 2025 पुढारी

# सोशल मीडियावरील माहितीवर विश्वास ठेवताना सावध राहा

## डॉ. शिवाजी जाधव; हिंदी विभागातील मीडिया लेखन कार्यशाळेचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय पत्रकारितेची वाटचाल ही संघर्ष, सामाजिक जाणीव आणि निर्भीड विचारांवर आधारित राहिली आहे. देशातील प्रारंभीच्या वर्तमानपत्रांनी आर्थिक अडचणी, सामाजिक दबावांचा सामना करत पत्रकारितेचा पाया भक्कम केला. महाराष्ट्रातील मराठी पत्रकारितेनेही अशाच कठीण परिस्थितीत ओळख निर्माण केली. या अनुभवांतूनच जबाबदार व निःपक्ष पत्रकार घडतो, असे मत मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी जाधव यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागात आयोजित सात दिवसीय मीडिया लेखन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी होत्या. डॉ. जाधव यांनी माध्यमातील मजकुराकडे नागरिकांनी चिकित्सक दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित केली. माध्यमांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांवर प्रश्न विचारले गेले, तर माध्यमांची गुणवत्ता उंचावू शकते. त्यामुळे कोणतीही बातमी स्वीकारण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. करेकट्टी यांनी या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये मीडिया लेखनाबाबत नवी दृष्टी आणि आत्मविश्वास निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमात विद्यार्थी प्रतिनिधी संदीप बरगे, स्वप्नाली धुलुगडे यांनी अनुभव मांडले. कार्यशाळेचे आयोजन डॉ. जयसिंग कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन अविनाश कांबळे यांनी केले. श्रीकांत देसाई यांनी आभार मानले.

27 DEC 2025

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समतेचा विचार आचरणात आणा

## वारणा महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रदीप कांबळे यांचे प्रतिपादन

**जनप्रवास : कोल्हापूर**

मध्ययुगीन काळातील संतांची कामगिरी आजही आदर्शवत आहे. तेंव्हा त्यांनी जातीभेद, कर्मकांड मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. परंतू आजही कर्मकांडावर विश्वास ठेवून अंधश्रध्येला बळी पडणारे लोक समाजात दिसतात. त्यामुळे सर्वांनी संतांनी दिलेला समतेचा विचार आचरणात आणा, असे प्रतिपादन ऐतवडे खुर्द येथील वारणा महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रदीप कांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय अंतर्गत न्यू कॉलेजमधील आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील होते. बीजभाषक म्हणून कॉमर्स कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी मार्गदर्शन केले.



**न्यू कॉलेजमधील आयोजित कार्यक्रमात डॉ. प्रदीप कांबळे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील. सोबत डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. कविता गगराणी, डॉ. अशोक बाचूळकर आदी.**

डॉ. कांबळे म्हणाले, मध्ययुगीन काळात संतांनी हिंदू, मुस्लिम यांच्यात समन्वय निर्माण केला होता. कबीर आयुष्यभर हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी झटले. परंतू आजही कबीर हिंदू की मुस्लिम यासंदर्भात संभ्रम कायम आहे. उत्तर व दक्षिण भारतातील संतांनी ऐक्याची शिकवण दिली आहे. संत तुकाराम आणि संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाची उंची वाढवली. एवढेच नव्हे तर आपल्या कार्यातून भक्ती चळवळीचा विस्तार केला. म्हणून गुरुग्रंथ साहेबामध्ये संत नामदेवांची ६१ पदे व तीन श्लोकांचा समावेश आहे.

डॉ. अशोक बाचूळकर यांनी भक्ती चळवळ आणि हिंदी साहित्यांचे ऐतिहासिक विवेचन या विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख डॉ. कविता गगराणी यांनी केले. ज्योतीर्मय पटवर्धन, ज्योती वरूटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शुभांगी माने, प्रा. प्रशांत कुचेकर यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

27 DEC 2025

लोकमत

# लघुउद्योजकांनी लष्करी सेवेतील संधींचा लाभ घ्यावा : पेशकार

## शिवाजी विद्यापीठात एमएसएमईसाठी मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लघुउद्योजकांनी लष्करी सेवेतील संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्र सरकारच्या राष्ट्रीय एमएसएमई बोर्डाचे सदस्य आणि नाशिक डिफेन्स इनोव्हेशन सेंटरचे संचालक प्रदीप पेशकार यांनी केले. प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळातर्फे शुक्रवारी विद्यापीठात नावीन्य आणि उद्योजकतेच्या क्षेत्रातील भागधारकांसाठी संवादात्मक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. आत्मनिर्भर भारत मिशन अंतर्गत मिळणाऱ्या नव्या संधी यावर त्यांनी मार्गदर्शन केले. या सत्रात एमएसएमई धोरणे, शासकीय साहाय्य योजना, स्टार्टअप्सच्या वाढी आणि विस्ताराच्या संधी, नवोपक्रम, बौद्धिक संपदा तसेच उद्योजकता परिसंस्थेचा विकास या विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले.

पेशकार यांनी केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देत उद्योजकांनी त्या योजनांचा प्रभावी लाभ कसा घ्यावा, याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे देत थेट संवाद साधला. संचालक प्रा. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. यावेळी अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड, काव्यश्री नलवडे तसेच स्टार्टअप्स, उद्योजक, पेटंटधारक इनक्युबेटीज, आदी उपस्थित होते.

27 DEC 2025

पुढारी



कोल्हापूर : तंजावर येथील राष्ट्रीय परिषदेत बोलताना प्रा. डॉ. नंदकुमार मोरे. समवेत मान्यवर. (छाया : मिलन मकानदार)

# तंजावरच्या मराठी वारशाच्या आंतरशाखीय संशोधनाची गरज

## प्रा. डॉ. नंदकुमार मोरे; तंजावर येथील राष्ट्रीय परिषद यशस्वी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

तंजावरच्या मराठी वारशावर सातत्याने आंतरशाखीय संशोधन करण्याची व दुर्मीळ हस्तलिखिते आणि सांस्कृतिक स्मृती जतन करण्याची आवश्यकता असल्याचे मत शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाचे प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

'तंजावर मराठी राज्य : इतिहास, भाषा, साहित्य आणि संस्कृती' या विषयावरील तीन दिवसीय राष्ट्रीय परिषद २२ ते २४ डिसेंबर २०२५ दरम्यान तंजावर येथील तमिळ विद्यापीठात पार पडली. परिषदेचे संयुक्त आयोजन तमिळ विद्यापीठ, तंजावर व शिवाजी विद्यापीठ यांनी केले. यास इतिहास व मराठी विभाग, महावीर कॉलेज, देवचंद कॉलेज, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद यांचे सहकार्य लाभले.

महाराष्ट्र व तामिळनाडू येथील इतिहासतज्ज्ञ, भाषाशास्त्रज्ञ व संशोधक परिषदेत सहभागी झाले होते. परिषदेत तंजावर मराठा सत्तेचा ऐतिहासिक वारसा, दक्षिण भारतातील मराठी भाषा, साहित्य, नाट्य, शिलालेख आणि सांस्कृतिक परंपरांवरील त्यांच्या दीर्घकालीन योगदानावर विशेष भर देण्यात आला. विविध तांत्रिक सत्रांत तंजावरमधील मराठी नाट्यपरंपरा, अप्रकाशित हस्तलिखिते, सरस्वती महाल ग्रंथालयातील संग्रह, मराठी शिलालेख, मध्ययुगीन व आधुनिक मराठी साहित्य तसेच तंजावर मराठा राजांच्या साहित्यिक योगदान या विषयांवर संशोधन निबंध सादर करण्यात आले.

27 DEC 2025
पुढारी

# शिक्षणशास्त्र अधिविभागात आयोजित विभागस्तरीय शोधनिबंध स्पर्धेस प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ शिक्षणशास्त्र अधिविभाग व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विभागस्तरीय शोधनिबंध स्पर्धस प्रतिसाद लाभला.

स्पर्धेचे आयोजन शिक्षणशास्त्र अधिविभाग व विभागातील शैक्षणिक व प्रशिक्षण संस्था यांच्या सामंजस्य करारा‌अंतर्गत करण्यात आले. याप्रसंगी शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. विद्यानंद खंडागळे व प्राचार्य डॉ. राजेंद्र भोई यांनी मार्गदर्शन केले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. लता पाटील व प्राची जगताप यांनी काम पाहिले. यामध्ये पाच जिल्ह्यांमधील स्पर्धकांनी विविध विषयांवर शोधनिबंध सादर केले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे, डॉ. रूपाली संकपाळ आदी उपस्थित होते.

27 DEC 2025
पुढारी



खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवडलेला विद्यापीठाचा जलतरणपटूंचा संघ.

# खेलो इंडिया स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या जलतरणपटूंची निवड

**कोल्हापूर :** चेन्नई येथे झालेल्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी जलतरण स्पर्धेत देशातील १६९ विद्यापीठांतील ७५० स्पर्धक सहभागी झाले होते. यातून कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या जलतरणपटूंच्या संघाची निवड खेलो इंडिया स्पर्धेसाठी करण्यात आली. संघात धिरिजा रमेश मोरे, अनुष्का सयाजी पाटील, कृष्णा शेळके, धैर्यशील किरण भोसले, चिन्मय सूर्यवंशी यांचा समावेश आहे. सर्वांना कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यापीठ क्रीडा विभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे, संघ व्यवस्थापक डॉ. प्रा. सुनील खराडे व शिवाजी विद्यापीठाचे प्रशिक्षक डॉ. प्रो. महेश पाटील, सुचय खोपडे, डॉ. राजेंद्र रायकर यांचे मार्गदर्शन लाभले.

27 DEC 2025

पुण्यनगरी

# शिक्षणशास्त्र अधिविभागात शोधनिबंध स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ आणि शिक्षणशास्त्र अधिविभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विभागस्तरीय शोधनिबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. याचे आयोजन शिक्षणशास्त्र अधिविभाग व विभागातील शैक्षणिक व प्रशिक्षण संस्था यांच्या सामंजस्य करारांतर्गत करण्यात आले होते. यासाठी शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. विद्यानंद खंडागळे, प्राचार्य डॉ. राजेंद्र भोई यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. भोई, डॉ. लता पाटील, प्राची जगताप यांनी काम पाहिले. यामध्ये ५ जिल्ह्यांमधील स्पर्धकांनी विविध विषयांवर शोधनिबंध सादर केले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रूपाली संकपाळ उपस्थित होत्या.

27 DEC 2025
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भक्तीच मानवी मनाला तारू शकते : डॉ. मेंदर्गी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आजच्या धकाधकीच्या जीवनात मानवी मनाला स्थैर्य व समाधान देण्याचे कार्य भक्तीच करू शकते, असे प्रतिपादन रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या प्राचार्या डॉ. वर्षा मेंदर्गी यांनी केले. शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय व न्यू कॉलेज येथील इतिहास व हिंदी विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील होते.

उद्घाटनपर बीजभाषणात डॉ. मेंदर्गी म्हणाल्या, भक्ती



संप्रदायामुळे समाजात सामाजिक बांधिलकी निर्माण झाली असून, तणावग्रस्त व धकाधकीच्या जीवनात भक्तीचा मार्गच मानवी मनाला तारू शकतो.

प्रस्तावना व पाहुण्यांची ओळख इतिहास विभागप्रमुख डॉ. कविता गगराणी यांनी करून दिली. आभार हिंदी विभागप्रमुख प्रा. अविनाश पाटील यांनी मानले. 'भक्ती चळवळ आणि हिंदी साहित्याचे ऐतिहासिक विवेचन' या विषयावर आजरा महाविद्यालयाचे हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. अशोक बाभूळकर आणि वारणा महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रदीप कांबळे यांनी साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सम्राज्ञी देसाई, ज्योतीमय पटवर्धन, ज्योती वरूटे यांनी केले. डॉ. शुभांगी माने, प्रा. प्रशांत प्र. कुचेकर, तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.